महाराष्ट्र टाइम्स

सोमवार, ३० एप्रिल २०१८

# हुतात्मा राजगुरू विद्यालयात उन्हाळी शिबिर

**पुणे :** पंख आणि क्विकहील फाउंडेशनच्या शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी एकदिवसीय उन्हाळी नाट्यशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पंख संस्थेच्या प्रमुख स्मिता आपटे, क्विक हिल फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, अभिनेते श्रीकांत यादव, अभिनेता शुभंकर एकबोटे आणि दिग्दर्शक व अभिनेता बॉबी हे उपस्थित होते. तसेच, राजगुरू चित्रपट नाट्य अभिनेते श्रीकांत यादव व शुभंकर एकबोटे यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी नृत्य व नाटक सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. राजा दगडे, पायल जाधव, अनघा हरकरे, अनिकेत साठे यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा शेटे व राजगुरू गर्ल्स विद्यालयाच्या पाटील यांचे सहकार्य लाभले. शिबिरासाठी विद्यालयाचे शिक्षक व शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले.